अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# सरकार बेदरकार आणि वीजदर सवलतीचा साक्षात्कार

राज्य असो किंवा देश असो. सरकार निर्णय घेताना राजकीय चष्मा डोळ्यासमोर ठेवूनच विचार करीत असते ते काही नवे राहिलेले नाही आणि मग त्याच राजकीय चष्म्याचा विचार केला तर निवडणुकीच्या तोंडावर सामान्य नागरिकाला वीज दरामध्ये सवलत देण्याची घोषणा होत असेल तर त्यात काही चुकीचे ठरत नाही. आज प्रचंड महागाई बोकाळली आहे की सामान्य माणसाला महिन्याचा खर्च भागविणे अत्यंत कठीण जात आहे. गॅस सिलिंडरच्या वाढलेल्या किमती, भाजीपाला, दररोज लागणारा गहू, तांदूळ, बाजरी एवढेच नव्हे तर दुधाचे भावसुद्धा दुप्पट-तिप्पट झालेले आहेत. गेल्या वर्षभरात तर प्रत्येक वस्तू ५० ते ६० रुपये किलोच्या वर मिळते. साधी कोथिंबीरीची जुडीसुद्धा स्वस्त राहिलेली नाही. रिक्षा, टॅक्सी, बस, रेल्वे यांचे भाडे असेच दुप्पट झाल्यामुळे सामान्य माणसाची चारही बाजूंनी कोंडी झाल्यासारखी परिस्थिती आहे. गेल्या वर्षभरात विजेच्या बिलामध्ये अशीच दुप्पट वाढ झाली. ५०० ते ८०० रुपयांच्या दरम्यान येणारे महिन्याचे विजेचे बील १३०० ते १६०० च्या घरात जाऊन पोहचले आणि लोकांना वीज दरवाढीचे हे शॉकच दिले गेले. आता सरकारने निवडणुकीच्या तोंडावर आणि अगदी मते मिळविण्यासाठी का असेना तर वीज दरामध्ये २० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला असेल तर आम्ही त्याचे स्वागत करतो. महागाईच्या वणव्यामध्ये आज कोणत्याही गरिबाला किंवा सामान्य माणसाला एक रुपयाची सूट किंवा सवलत मिळाली तरी त्यांना हवी आहे. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातल्या जवळपास २ कोटी १४ लाख वीज ग्राहकांना मोठा दिलासा मिळेल. मुंबईतदेखील जवळपास ३० लाख घरगुती वीज वापरणाऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. तूर्त सरकारने राज्य वीज वितरण कंपनीच्या ग्राहकांसाठी ही सवलत दिली असली तरी मुंबईतल्या इतर ग्राहकांनादेखील त्याचा लाभ दिला गेला पाहिजे. अशा या महागाईच्या दिवसांमध्ये सवलतीचा हा दिलासा मोलाचा ठरतो आणि म्हणूनच राज्यकर्ते भलेही मतांसाठी हे राजकारण खेळत असले तरी लोकांच्या बाजूने विचार करताना असे राजकारण चुलीत गेले तरी चालेल. कारण महागाईच्या भीषण परिस्थितीत गरिबांच्या पोटातील आग विझणे जास्त महत्त्वाचे आहे. आता या वीज सवलतीच्या निर्णयाने काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात, ही गोष्ट खरी आहे. त्याचेसुद्धा उत्तर सरकारकडून किंवा राज्यकर्त्यांकडून मागितले गेले पाहिजे.

## सामान्य माणसाला दिलासा

साधारणपणे महिन्याला ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्यांना ही सवलत देण्याचा सरकारचा विचार आहे. अर्थात काही तज्ज्ञांच्या मताप्रमाणे ही वीज दर सवलत लोकांच्या डोळ्यांत धूळफेक करणारी ठरते. कारण गेल्या दीड वर्षापासूनच प्रत्येक वीज बिलामध्ये २० टक्के इंधन समायोजन कर लागू केला गेला. त्यातून सरकारला अक्षरश: कोट्यवधी रुपयांचा लाभही झालेला आणि म्हणूनच आता ही वीज सवलत देऊन सरकार लोकांवर कोणतेही उपकार करत नाही. उलट लोकांची फसवणूक किंवा दिशाभूल करून वाढीव वीजदर आणि इंधन समायोजन कर वसूल केला गेला. त्याचीच व्याजासकट परतफेड सरकारने करायला हवी. इतके दिवस वीज सवलत तर सोडाच पण आणखीन वीज दरवाढ करायला लागेल अशा प्रकारच्या वल्गना सरकार करीत होते. वीज दर ठरविण्याचे काम वीज नियामक आयोगाकडून होते. सर्व बाजूंचा विचार करून हा आयोग वीजेचा दर निश्चित करते. हे जर खरे असेल तर मग आता वीज दरात सवलत देण्याचा साक्षात्कार सरकारला कसा काय झाला? असा प्रश्न निर्माण होतो. कारण वीज नियामक आयोगाने निश्चित केलेले दर चुकीचे होते असे म्हणायचे का? असा मूलभूत प्रश्नही निर्माण होतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, सरकारने २० टक्के सवलतीची घोषणा केली असताना आता ऊर्जा मंत्रालयातल्या अधिकाऱ्यांनी ही सवलत ४० टक्क्यांपर्यंत जाईल, अशी शक्यता वर्तविली आहे. कारण या सवलतीच्या बरोबरच २० टक्के इंधन समायोजन करही रद्द केला जाऊ शकतो. म्हणजे तब्बल ४० टक्क्यांनी वीज बिलामध्ये कपात होईल. म्हणजे प्रत्येक सामान्य माणसाला महिन्याला किमान ५०० ते ८०० रुपयांची सवलत उपलब्ध होईल, असे समजायला हरकत नाही.

## कंपन्यांचे उखळ पांढरे करू नका

अर्थात पुन्हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो की, आता ४० टक्क्यांपर्यंत सवलत द्यायला निघालेल्या सरकारने आतापर्यंत ४० टक्के जादा रक्कम लोकांकडून वसूल केली म्हणून केवळ राजकीय चष्मा लावून लोकांच्या प्रश्नांकडे पाहिले जाते. मतांसाठी आणि सत्तेसाठी लोकांवर कसे भुर्दंड लावले जातात आणि सरकारी तिजोरीवरही बोजा टाकला जातो हे यानिमित्ताने पुन्हा एकदा दिसून आले. ही वीज सवलत देताना सरकारवर जवळपास २ हजार कोटींचा बोजा पडेल, अशा प्रकारच्या अंदाजालाही सुरुवात झाली आहे. परंतु हा सगळा आकडेवारीचा बनवाबनवीचा खेळ असतो. या गोष्टींचा वीजदराची आकारणी करताना विचार व्हायला हवा. त्यावेळी मात्र लोकांपेक्षाही वीज कंपन्यांच्या फायद्याच्या, कंत्राटदाराच्या फायद्याच्या आणि भ्रष्टाचारातून स्वत:च्या खिशात पडणाऱ्या गोष्टींचाच विचार केला जातो आणि म्हणूनच विजेचे दर अव्वाच्या सव्वा आकारले जातात. दिल्लीमध्ये हीच बनवाबनवी अरविंद केजरीवाल यांनी उघड केली आणि सत्तेत आल्यानंतर विजेच्या दरात कपातही केली. आमचे म्हणणे असे आहे की, सवलत जाहीर करताना ती कोणत्या निकषावर केली गेली हे सांगितले गेले पाहिजे आणि भविष्यकाळात वीज उत्पादनाचा आणि वितरणाचा एकूण खर्च लक्षात घेऊन वीजदर नक्की केले पाहिजेत. आतादेखील ही सवलत देताना सरकारी तिजोरीतून वीज कंपन्यांचे भले केले जाणार असेल तर तेही चुकीचे ठरते. मूळातच या वीज कंपन्यांनी नक्की केलेल्या वीज दरांचाही पंचनामा झाला पाहिजे तरच त्या सवलतीला काहीतरी अर्थ असेल.